# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 05.03.2026** **वार- गुरुवार**

---

**<u>बीजसोहळा</u>**

संत तुकाराम महाराज यांचा 378 वा बीज सोहळा आज श्रीक्षेत्र देहू नगरीत हजारो भाविक आणि वारकरी यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. पहाटे तीन वाजता काकड आरती साठी मंदिराचा दरवाजा उघडण्यात आला. त्यानंतर मंदिर परिसरात दर्शनासाठी भाविकांच्या रांगा लागल्या होत्या.

टाळ मृदुंगाचा गजर आणि अभंगांनी देहूचं वातावरण आज भक्तिमय झालं होतं . तुकाराम बीजेनिमित्त गेल्या दोन दिवसांपासून भाविकांच्या सोयीसाठी पीएमपीनं अधिकच्या गाड्या सोडल्या आहेत.

देहू संस्थांनच्या वतीनं सप्ताहाचं आयोजन करण्यात आलं असून आठवडाभर भजन कीर्तन अभंग महापूजा असे धार्मिक उपक्रम सुरू राहणार आहेत.

**<u>राजाराम महाराज जयंती</u>**

स्वराज्याचे तिसरे छत्रपती, छत्रपती राजाराम महाराज यांची तिथीनुसार जयंती आज प्रथमच सिंहगडावर उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्त अभिषेक, पूजन, भजन आणि इतिहासप्रेरित व्याख्यानांच्या माध्यमातून स्वराज्यभावनेचा जागर करण्यात आला.

राजाराम महाराजांच्या समाधीस्थळी अभिषेक झाल्यानंतर छत्रपतींच्या जयघोषात पालखी सोहळ्याला सुरुवात झाली. यानंतर पालखीने नरवीर तान्हाजी मालुसरे यांच्या समाधीस्थळी जाऊन अभिवादन करण्यात आलं. पुढे श्री अमृतेश्वर मंदिरात कार्यक्रमाचा समारोप झाला. इतिहास अभ्यासक प्रथमेश खामकर यांनी राजाराम महाराजांच्या जीवनकार्यावर भाष्य करत स्वराज्य रक्षणासाठी त्यांच्या संघर्षाची आठवण करून दिली.

**<u>कामगार कल्याण निधी</u>**

पुणे महापालिकेच्या सेवेत असताना मृत्यू झालेल्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना ,कामगार कल्याण निधीतून देण्यात येणाऱ्या रकमेत वाढ होऊन ही रक्कम २ लाख रुपये करण्यात आली आहे. तर कामावर असताना निधन झाल्यास देण्यात येणारी मदतीची रक्कमही ५ लाख रुपये करण्यात आली आहे. याची अंमलबजावणी १ एप्रिल २०२६ पासून करण्यात येणार आहे.

पुणे महापालिकेत एकंदर १८ हजार कायम सेवेतील अधिकारी आणि कर्मचारी नियुक्त आहेत.

**<u>आंतरराष्ट्रीय महिलादिन</u>**

आंतरराष्ट्रीय महिला दिनाचं औचित्य साधून येत्या 7 मार्च ला पुणे शहरातल्या मुद्रांक शुल्क विभागाच्या दुय्यम निबंधक कार्यालयाचं सर्व कामकाज महिला कर्मचारी सांभाळणार असल्याची माहिती मुद्रांक जिल्हाधिकारी संतोष हिंगाणे यांनी दिली. पुणे शहर कार्यालयाच्या अंतर्गत असलेली 11 सह दुय्यम निबंधक कार्यालयं केवळ महिला पक्षकार आणि महिला वकिलांसाठी सुरू ठेवण्यात येणार आहेत.

**<u>रिक्षाचालकांचे परवानेनिलंबित</u>**

प्रवाशांकडून मीटर पद्धतीने भाडे न आकारता मनमानी भाडे आकारणाऱ्या पुण्यातल्या १७५ बेशिस्त रिक्षाचालकांविरोधात उपप्रादेशिक परिवहन कार्यालयानं कठोर कारवाई केली आहे. यामध्ये सहा रिक्षा चालकांचे परवाने तात्पुरते निलंबित करण्यात आले असून, उर्वरित रिक्षाचालकांवर दंडात्मक कारवाईतून सुमारे ५५ लाख रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. रिक्षाचालकांना मीटरप्रमाणे भाडे आकारण्याबाबत निर्देश देण्यात आले असून, त्यांच्या अडवणुकीबद्दल ८२७५३३०१०१ या व्हॉट्सअँप क्रमांकावर तक्रार आणि छायाचित्र पाठवल्यास प्राप्त तक्रारींवर त्वरीत कारवाई करण्यात येणार आहे.

**<u>भूसंपादन</u>**

मुळा नदीवरील बालेवाडी–वाकड पुलाकडे जाणा-या रस्त्यासाठी भूसंपादन करण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने दिले आहेत. २०१३ च्या भूसंपादन, पुनर्वसन आणि पुनर्स्थापना कायद्यानुसार आवश्यक कार्यवाही एक वर्षाच्या आत पूर्ण करण्याचेही आदेश दिले आहेत. बालेवाडी, बाणेर आणि वाकड परिसरात झपाट्याने वाढणाऱ्या लोकसंख्येमुळे वाहतूक कोंडीची समस्या तीव्र झाली आहे. पुलाचे काम अपूर्ण असल्यानं सध्या नागरिकांना मुंबई–बंगळुरू महामार्ग किंवा विशालनगर मार्गे वळसा घालून प्रवास करावा लागत आहे . यासाठी अतिरिक्त अंतर आणि वेळ खर्च होत आहे याकडे याचिकाकर्त्याने लक्ष वेधले.

**<u>कृषीअधिकारी निलंबित</u>**

जुन्नर तालुक्यातल्या बेल्हे कृषी मंडळांत ठिबक सिंचनासाठी देण्यात येणाऱ्या अनुदानात गैरव्यवहार झाला असून, याप्रकरणी दोन कृषी अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आल्याची माहिती पुणे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संजय काचोळे यांनी दिली. ठिबक संचासाठी आलेल्या 461 प्रस्तावांच्या पडताळणीत 348 प्रस्ताव बनावट असल्याचे आढळून आलेत. यात सहभागी असलेल्या तीन दुकानदारांना काळ्या यादीत टाकण्यात आले आहेत.

**<u>महाराष्ट्र केसरी कुस्ती</u>**

68 वी महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत सहभागी होण्यासाठी येत्या 8 मार्च ला राष्ट्रीय तालीम संघ इथं पुणे शहर संघाची निवड चाचणी होणार आहे. माती आणि गादी विभागात तसंच महाराष्ट्र केसरी किताब गट अशा वजनी गटात पुण्यातल्या कुस्तीपटूंनी सहभागी व्हावे असे आवाहन राष्ट्रीय तालीम संघाने केले आहे.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमानात वाढ होऊन ,कमाल तापमान 37 आणि किमान 15 पूर्णांक 8 दशांश अंश सेल्सिअस नोंदवण्यात आलं. उद्याही तापमानात फारसा बदल संभवत नसल्याचा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी ६ वाजता ताज्या पुणे वृत्तांतसह. नमस्कार.**